# सेवक वार्ता

मार्च -२०२५

वर्ष -६ अंक- ५

सेवानिवृत्त वनकर्मचारी संघ, महाराष्ट्र परिवाराचे विविध उपक्रम, विचारमंथन, घडामोडी, साहित्य याचे संवाद पत्र


## सेवक संघातर्फे महाराष्ट्र जनुक कोष प्रकल्पाच्या दोन कामासाठी प्रस्ताव सादर

महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळांतर्गत येणा-या महाराष्ट्र जनुक कोष प्रकल्पाच्या जाहिरातीस अनुसरून सेवक संघाने महाराष्ट्र जनुक कोष प्रकल्पाच्या संवर्धन कामाच्या ७ घटक कामांपैकी गवताळ क्षेत्र व कुरण संवर्धन व संदेश, लोक शि क्षण व जन जागृती या दोन कामासाठी प्रस्ताव सादर केला आहे.

गवताळ क्षेत्र व कुरण संवर्धन ७ घटक महाराष्ट्रातील गवताळ प्रदेश आणि सवाना या अत्यावश्यक परंतु असुरक्षित पर्यावरणीय प्रणाली ज्यां निवासस्थानाचा नाश, हवामान बदल आणि अतिवापर यासारख्या वाढत्या धोक्यांमुळे संवर्धन कामाची तातडीने आवश्यकता आहे. त्यांचे संरक्षण, माती संधारण आणि पाण्याचे नियमन, वैज्ञानिक संशोधन, शाश्वत जमीन व्यवस्थापन पद्धती आणि सक्रिय समुदाय सहभाग एकत्रित करून समग्र संवर्धनाची चौकट विकसित करत यासारख्या पर्यावरणीय सेवा जपण्यासाठी योजना राबविणे या प्रकल्पाचे उद्दीष्ट आहे.

महाराष्ट्र जनुक कोष प्रकल्पासंबंधी सर्वसाधारणपणे जैवविविधतेबद्दल प्रचारासाठी संदेश, लोक शिक्षण व जन जागृती घटकांतर्गत जनमानसातील विविध घटक - विद्यार्थी, तरुण आणि प्रौढ अशा स्तरांवर जागरूकता निर्माण करण्यासाठी ऑडिओ, व्हिडिओ आणि मुद्रण सामग्री प्रचारासाहित्य तयार करणेसह इतर कार्यक्रमांचा समावेश आहे.

## सेवक संघातर्फे सुवर्ण पदक देण्याबाबत प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर

अपर मुख्य सचिव (वने ), यांना कुंडल आणि चंद्रपूर येथील वन प्रबोधिनीमध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या वन परिक्षेत्र अधिकारी संवर्गातील प्रशिक्षणार्थीमधून प्रथम येणाऱ्या प्रशिक्षणार्थींना सेवक संघातर्फे सुवर्ण पदक देण्याबाबत प्रस्ताव पत्राव्दारे कार्यकारी अध्यक्ष यांनी सादर केला असूनत्यास शासनाची मान्यता प्रदान करण्याची नम्र विनंती केली आहे. याव्दारे सन २०२३-२४ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेतील एका मुद्याबाबत त्वरीत पुर्तता झाली आहे.

## गुढी पाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा

## सेवक संघ धुळे शाखेची सन २०२३-२४ ची सर्व साधारण वार्षिक सभा संपन्न

दि. ८ मार्च २५ रोजी श्री एस. आर. पाटील उपाध्यक्ष, सेवक संघ, धुळे शाखा यांचे जामनेर तालुक्यातील पिंपळगाव गोलाईत येथील फार्महाऊस/ शेतात निसर्ग रम्य एकांत ठिकाणी सेवक संघ धुळे शाखेच्या सर्व वार्षिक सर्व साधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते.

सभेच्या प्रारंभी स्वागतोपर जाहीर खालील अजेंड्याप्रमाणे कामकाज पार पडले.

(१) मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणेत आले.

(२) धुळे शाखेने सन २०२३-२४ या वर्षात केलेल्या कामाचा आढावा घेणेत आला .

(३) धुळे शाखेचे सन २०२३-२४ चा सेवक संघाचे सनदी लेखापाल यांचे अहवालानुसार सचिव सेवक संघ, धुळे शाखा, धुळे यांनी तयार केलेला/वार्षिक जमा-खर्च मांडला.

(४) धुळे शाखेचे सदस्य नोंदणीचा आढावा घेणे व सदस्यांची नोंदणी वाढविणेवर चर्चा करणेत आली.

(५) धुळे शाखेचे सन २०२४-२५, २०२५-२६ साठी वार्षिक कार्यक्रम, धोरण व अंदाज पत्रक ठरविणेवर चर्चा झाली.

(६) वन व वन्यजीव संरक्षण, संवर्धन संबंधी उत्कृष्ठ कामाबद्दल चार व्यक्तींचा सन्मान पत्र, शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देउन सत्कार करणेत आला.

(७) सन २०२४-२५ ते २०२६-२७ साठी शाखेच्या नवीन कार्यकारिणीची निवड करणेत आली.

(८) आयत्या वेळचे विषयात

वार्षिक सभेचे आयोजनाचा -बैठक व्यवस्था, भोजन अल्पोपाहार अशा मोठ्या खर्चाची जबाबदारी श्री एस. आर. पाटील यांनी स्वेच्छेने स्विकारत व आग्रहपूर्वक आमंत्रित करीत सभेचे आयोजन करून ते यशस्वी केले. सभेला १६ सदस्यांनी हजेरी लावली, जे धुळे, चाळीसगाव, जळगाव, संभाजीनगर व नाशिक येथून आले होते.

उपस्थितात धुळे येथून श्री. एस. के. गवळी , जयप्रकाश पाटील, पी.एच.वाघ, निकुंबे ,आर डी पाटील ,विठ्ठल पवार, ४० गाव येथून एन एस राजपूत, ह.भ.प. बी आर छल्लारे, जी के निकम , जळगाव येथून डी एन

पाटील, पी पी सूर्यवंशी, पी टी पाटील, फुलंब्री येथून डी एस जाधव ,जामनेर येथून एस. आर. पाटील आले होते.

वनासंबंधी उत्कृष्ठ काम करणारे श्री विवेक देसाई, श्री रविंद्र मा. महाजन, श्री. नारखेडे बंधू यांचा सत्कार करण्यात आला.

श्री. रविंद्र माधवराव महाजन, आदर्श शेतकरी, रा. जामनेर, यांचा कृषि-वानिकी अंतर्गत उत्कृष्ठ व यशस्वीरित्या किसान रोपवाटिका निर्मिती करणे, स्वत:ची मातोश्री रोपवाटिका स्थापन करून त्याव्दारे माझी वसुंधरा अभियानांतर्गत भडगाव नगरपालिका क्षेत्रात स्वखर्चाने वन रोपे वाटप करणे या कामाबाबत सत्कार करण्यात आला.

श्री. विवेक विजयराव देसाई, मानद वन्यजीव रक्षक, जळगाव यांचा एक तपाहूनही अधिक काळापासून वन विभागात कार्यरत कर्मचा-यांना नियमितपणे वन व वन्यजीव संवर्धन, संरक्षण अशा अनेक विषयांवर विविध प्रकारे व सामाजिक माध्यमातून विनामूल्य मार्गदर्शन आणि लोकजागर कामाबाबत सत्कार करण्यात आला.

श्री. अनिल व नरेंद्र विष्णू नारखेडे, सामाजिक कार्यकर्ते, रा. फैजपूर, यांचा सामाजिक कार्याचा अविभाज्य भाग म्हणून दोन दशकांपासून जळगाव जिल्ह्यातील सातपुडा पर्वतातील वने व वन्यजीव यांचे संरक्षणकामी सातत्याने सजग राहून वन संपदेचे संवर्धनात मोलाचे कार्य करत आहेत. वन विभागास सहकार्य केल्याबाबत सत्कार करण्यात आला.







सर्व साधारण सभेची क्षण चित्रे.























कार्यक्रमाअंती ह.भ.प.श्री नरेन्द्र नारखेडे यांचे मधूर आवाजात मानवी जीवनावरील सुंदर प्रबोधन झाले. तसेच ह. भ. प. छल्लारे महाराज यांनीही प्रबोधन केले.

**या वार्षिक सभेत ८ मार्चचे महिला दिनानिमित्त प्रसंगोचीत तीन शेतकरी महिलांचा पुष्पगुच्छ देउन सत्कार करण्याचा दुग्ध शर्करा योग जुळून आला.**





श्री डी. एन.पाटील, ८२ वर्षाचे जेष्ठत्तम सदस्य वआले आणि सर्वांची त्यांचेशी ओळख झाली.

या कार्यक्रमात आर. डी.पाटील, सेनि सवसं, पी. पी. सूर्यवंशी, सेनि सवसं, पी. टी. पाटील, डि. एस. जाधव सेनि वनपाल, आले. या नवीन सदस्यांनी कार्यक्रमाला शोभा आणली.

श्री पी टी पाटील हे आजीवन सदस्य झाले, तर आर. डी.पाटील, सेनि सवसं, पी. पी. सूर्यवंशी, सेनि सवसं, डि. एस. जाधव, सेनि वनपाल साधारण सदस्य झाले.

वेधक वृत्त

## कोलामार्क संवर्धन क्षेत्र.

घनदाट वृक्षराजींनी बहरलेले कोलमार्कचे जंगल रान म्हशी तसेच वाघ,चितळ,सांबर, निलगाई, गवे,रान डुकरे,शेकरू अशा वन्यजीव संपदेने नटलेले आहे. विविध पक्षीही या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात आढळून येतात. सिरोंचा वन विभागातील कमलापूर येथील हे कोलामार्क संवर्धन राखीव क्षेत्र रान म्हशीसाठीही प्रसिद्ध असून या क्षेत्राचा १० वर्षाचा आराखडा करण्याचे काम सेवक संघाने हाती घेतले आहे.

या भागात पूर्वीपासून काम करणारे रोजंदारी मजूर श्री लक्ष्मण चौधरी व श्री कपिल गुंडावार यांनी विविध वन्य पशू-पक्षी यांची आकर्षक छाया चित्रे काढून जतन केली आहेत. गरीब परिस्थिति असून देखील निसर्ग प्रेमापोटी या दुर्गम भागात वन्य जीवांच्या अधिवासाचे संरक्षण करणे, नियमित गस्त घालणे, अग्नि संरक्षण करणे अशा कामात सहभागी होऊन वन संवर्धनात उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे. विशेष म्हणजे सदरचे क्षेत्र नक्षलग्रस्त असूनही त्यांनी जोखीम घेऊन ही कामे पार पाडली आहेत. त्यांच्या या कामाची सेवक संघाने दखल घेऊन वार्षिक सर्व साधारण सभेत त्यांना सन्मान पत्र व रोख रक्कम रु १००० प्रत्येकी देण्याचा ठराव पारित केला होता.

त्यानुसार चंद्रपूर वन अकादमी मध्ये दिनांक २६ फेब्रुवारी २०२५ रोजी त्यांचा श्री आर. के. पोळे व श्री. एस. के. गवळी निवृत्त वनाधिकारि यांच्या हस्ते त्यांना पुष्पगुच्छ व रोख रक्कम देऊन सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी सेवक संघाचे चंद्रपूर येथील पदाधिकारी व १९७८-८० काळात प्रशिक्षण घेतलेले गुजरात, मध्य प्रदेश,राजस्थान,कर्नाटक व महाराष्ट्रातील निवृत्त वनाधिकारि उपस्थित होते. श्री प्रदीप कुळकर्णी यांनी प्रास्तविक करून सेवक संघाच्या विविध कार्याचा परिचय करून दिला.

त्या प्रसंगाची काही क्षण चित्रे.





नवीन आजीवन सदस्य

**श्री. पी. टी. पाटील, सेनि वपअ, नाशिक, हे धुळे शाखेचे आजीवन सदस्य झाले.**

### निधन वार्ता

(१) एम्. एस. नाईक, सवसं सेनि यांचे दि. ०६.०३.२०२५ ला दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास ठाणे येथे हृदय विकाराच्या झटक्याने निधन झाले. ते 1967-69 SFRC Batch चे प्रशिक्षणार्थी होते. सवस पदावरून सेवानिवृत्त झाले होते. ते ठाणे येथील वनविहार सोसायटीचे प्रवर्तक तथा माजी अध्यक्ष होते.

केवळ खाजगी वितरणासाठी
प्रकाशक - सेवक संघ, महाराष्ट्र, पुणे
संपादन - एस. के. गवळी
कार्यालय - वन ग्रंथालय, दुसरा मजला, वनभवन, भांबुर्डा वन विहार, गोखले नगर, पुणे - १६